
ISSN - 2249-5029




# Indian Journal of Innovative Research in Arts

(Interdisciplinary Journal)

## Special Issue on HRPSI-2015

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 60 | भारतीय संविधान आणि मानव अधिकार | सुनिता मनवर | 184 |
| 61 | स्त्रियांच्या दर्जाची वास्तविकता आणि मानवाधिकार | अस्मिता ठोंबरे -मनवर | 187 |
| 62 | मानवाधिकाराच्या रुजवणुकीतील अडथळा : दहशतवाद | किशोर मुळे | 191 |
| 63 | मानवाधिकार : मानवी मुल्ये व त्याचे रक्षक | जि. डब्ल्यु. निशाणे | 195 |
| 64 | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ | डी.बी. पवार | 198 |
| 65 | पर्यावरण संरक्षण - एक मुलभूत अधिकार | प्रा. कैलास के. पवार | 201 |
| 66 | भारतीय संविधानातील मानवी हक्कांची समीक्षा | प्रा. रमेश एम. राठोड | 203 |
| 67 | शिक्षण, शिक्षणाची वास्तवता आणि मानवी हक्क | प्रा. सिमा शेटे आणि प्रा. शुभांगी सावळे | 205 |
| 68 | बालकामगार आणि मानवी हक्क | प्रा. एस,एन, ठाकरे आणि सहा.प्रा.नासीर कासम शेख | 210 |
| 69 | पर्यावरणाचा ऱ्हास आणि मानवी हक्क | प्रा. एन के सोरे | 212 |
| 70 | बालकामगारांचे हक्क | डॉ. अनंत सूर्यकार | 215 |
| 71 | मानवी हक्क आणि स्त्री सबलीकरण | डॉ. गोपाल तडस | 218 |
| 72 | लोकशाही व्यवस्था व मानवी हक्क | प्रा. विलास एस. टाले | 220 |
| 73 | मानवी हक्काच्या संरक्षणासाठी माहीतीचा अधिकार | प्रा.प्रमोद आर. तायडे | 223 |
| 74 | भारतीय संविधान आणि मानवाधिकार | प्रा.रमेश ना. तिजारे | 226 |
| 75 | मानवी हक्क आणि भ्प्ट बाधीतांची वास्तविकता एक अभ्यास | प्रा. डॉ. राजेंद्र शंकरराव उमरे व प्रा. सीमा विठ्ठलराव शेटे | 229 |
| 76 | स्त्री श्रमिकांचे शोषण व मानवी हक्क | प्रा.डॉ.स्वप्ना एस. देशमुख | 234 |
| 77 | एड्स आजार व त्या संबंधीचे मानवधिकार | रविंद्र जी. दाभाडकर | 237 |
| 78 | मानवाधिकार व बालकामगार | रेखा व्हि. इंगोले | 239 |
| 79 | भारतातील महिलांची स्थिती व मानवाधिकार | संतोष एल. जाधव | 242 |
| 80 | भारतीय संविधानातील मुलभुत हक्क व मानवाधिकार | प्रा. जयवंत निवृत्ती कांबळे | 245 |
| 81 | मानवी अधिकाराच्या अंमलबजावणीत भारताचा सहभाग | प्रा. दिनेश भा. खेरडे | 248 |
| 82 | मानवी हक्क: महिला आणि भारतीय संविधान | डॉ. अपर्णा पाटील | 250 |
| 83 | पर्यावरण संरक्षण - एक मुलभूत अधिकार | प्रा. कैलास के. पवार | 254 |
| 84 | मानवी हक्क व भारतीय संविधान संस्कृती | डॉ.डी.एन.राठोड | 256 |
| 85 | मानवाधिकार, आकाशवाणी व संगीताचे स्थान | डॉ.चंद्रकिरण घाटे | 258 |
| 86 | दुर्बल घटकाचे शोषण आणि मानवाधिकार | एल.एस. पाटनकर आणि संकेत धनंजय रोठे | 261 |
| 87 | भारतीय संविधान व मानवी हक्काची सनद | प्रा. लक्ष्मण एफ. शिराळे | 264 |


Scanned by CamScanner

# मानवी हक्काच्या संरक्षणासाठी माहीतीचा अधिकार

प्रा.प्रमोद आर. तायडे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, श्री व. ना. कला व श्री अ. ना. वाणिज्य महाविद्यालय, मंगरूळपीर जि. वाशिम.

**प्रस्तावणा**

मानवी हक्क ही संकल्पना २० व्या शतकात जगात सर्वत्र चर्चेचा विषय बनली. मानवी हक्क हा विचार २० व्या शतकांत झालेल्या दोन महायुध्दांशी व त्यातील अपरिमित जीवीत हानीशी संलग्नित आहे.

दुसऱ्या महायुध्दात अमेरिकेने केलेल्या बॉम्बहल्ल्यांमुळे झालेली मानवी जीवनाची वाताहत व तत्पुर्वी नाझी जर्मनांनी केलेली सुमारे ६० लाख ज्यूंची हत्या यामुळे जगातील तज्ञ विषण्ण झाले. त्यातून मानवी हक्कांचे जतन करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने १०डीसेंबर१९४८रोजी ''मानवी हक्कांचा सार्वभौमिक जाहीरनामा'' घोषित केला व मानवी जीवनाच्या क्षेत्रात एक नविन अध्याय सुरु झाला. त्यानंतर नागरी व राजकीय मानवी हक्क तसेच आर्थिक, सामाजिक व सांस्कृतीक हक्क प्रदान करणारे जाहीरनामे क्रमाने जाहीर केले गेले. हे जाहीरनामे स्वातंत्र, समता व बंधुता या मुलभूत तत्वांशी निगडीत आहेत.

व्यक्तीला सन्मानपुर्वक जीवन जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व अधिकारांचा समावेश मानव अधिकारात होतो. मानवी हक्कांची व समर्पकता तपासतांना नागरीकांना अनेक हक्क बहाल केले हे खरे असले तरी त्या हक्काचे पालन केले जाते कां, हा प्रश्न संध्या जितका महत्वाचा आहे तितकाच त्यांचे उल्लंघन करणाऱ्यांना शिक्षा होणार का हाही प्रश्न महत्वाचा ठरतो. मानवी हक्कांचे उल्लंघन करतांना बळी पडणाऱ्या व्यक्तींना सामाजिक न्याय मिळण्याच्या संदर्भात समाजाची, सरकारची कर्तव्य कोणती आणि मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी केलेल्या उपाययोजना तपासून पाहणे हा या शोध निबंध लेखाचा उोश.

**मानवी हक्कांची सार्वभौम घोषणा**

मानवी हक्कांच्या सार्वभौम घोषणेस आंतरराष्ट्रीय मानवी हक्कांचे घोषणापत्रही समजले जाते.

मानवी अधिकाराची सनद जाहीर झाल्यापासून अनेक विचारवंतांनी मानव अधिकाराची परिभाषा करण्याचाप्रयत्न केला पण सरळ, सोपी परिभाषा अध्यापही करता येवू शकली नाही. मानव अधिकार हे नैसर्गिक अधिकार, मुलभूत अधिकार या स्वरुपातही ओळखले जातात. मानव अधिकार म्हणजे असे अधिकार जे व्यक्तीला मनुष्य या नात्याने जन्मापासून मिळालेले आहेत. या अधिकाराचे उगमस्थान नैसर्गिक अधिकारामध्ये आहे. स्वातंाय सन्मानपुर्वक जगण्याचा अधिकार, संपत्तीचा अधिकार, अन्यायविरुध्द दाद मागण्याचा अधिकार आदी अधिकाराचा समावेश मानव अधिकारात होतो. या सर्व अधिकारांना सामावण्याऱ्या काही परीभाषा पाहणे आवश्यक आहे.

१) **इलेनोर रुझवेल्ट**यांच्या मते, कुटूंबातून मानवी हक्कांचा उगम होतो जर कुटूंबातून मानवी हक्क जोपासले गेले तर त्या समाजात किंवा देशात मानवी हक्कांचे पालन होईल.

मानवी हक्क हा दुहेरी कायदा असून एका व्यक्तीचे व्यक्ती स्वातंाय अबाधित राहणे हे दुसऱ्या व्यक्तीचे कर्तव्य असते आणि हे हक्क त्यांच्या कर्तव्यातून उमगले नसून व्यक्ती स्वातंायावरच ते अवलंबून असते.

मानव अधिकार स्वातंाय, न्याय आणि शांततेचे प्रतिक आहेत. देशो-देशीच्या सीमांचे बंधन न पाळता जात, धर्म, वंश, भाषा लिंग दर्जा इत्यादी भेदभावाशिवाय जगातील प्रत्येक व्यक्तीला हे अधिकार बहाल केले आहेत. यामुळे संयुक्त राष्ट्र संघटनेने मानव अधिकारांना आंतरराष्ट्रीय स्वरुप प्राप्त करून दिले व जागतीक लोकमत मानव अधिकारांबाबत संवेदनशिल बनविले. प्रत्येक व्यक्तींला व्यक्तीमत्व स्वातंाय व संपूर्ण विचार घडविण्याचा या जाहिरनाम्यात उल्लेख आहे.

**माहितीचा अधिकार कायदा २००५**

''माहितीचा कायदा'' ही संकल्पना स्वीडनने जगाला दिलेली एक अनमोल देणगी आहे. १७७६ मध्ये स्वीडनने सुमारे सव्वादोनशे वर्षापुर्वी आपल्या सर्व नागरीकांना माहितीचा अधिकार देणारा कायदा मंजूर केला. आतापर्यन्त जगभरातल्या ५६ राष्ट्रांनी आपआपल्या देशात माहितीचा हा कायदा संमत केला आहे. आणि भारत देशही आता त्यांच्या पंक्तीत जाऊन बसला आहे.



Scanned by CamScanner

महात्मा गांधी यांनी असे म्हटले होते की, ''काही मुठभर लोकांच्या हातात सत्ता देवून खरे स्वराज्य साकार होणार नाही, तर सत्तेच्या दुरुपयोगाला विरोध करण्यांचे सामर्थ्य सर्व जनतेला प्राप्त होईल, तेव्हाच खरे स्वराज्य साकार होईल.''महात्मा गांधीचे वरील वचन माहितीच्या अधिकाराला तंतोतंत लागू पडते. माहितीचा अधिकार म्हणजेच सत्तेच्या दुरुपयोगाला विरोध करण्यांचे जनतेला मिळालेले सामर्थ्य. संयुक्त राष्ट्र संघाने १९४६ साली ''माहितीचा अधिकार हा मानवाचा मूलभुत अधिकार'' असल्याचे एका ठरावाने घोषित केले आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यन्त अनेक कायदे तयार करण्यांत आले. तथापी, शासन व जनता यांची जवळीक साधणारा हा कायदा तसा थोडा वेगळा मानावा लागेल. या कायद्यामुळे आपला सामाजिक दृष्टीकोन बदलणार आहे. सर्व सर्व कायदे हे जनतेने पाळायचे आणि शासन यंत्रणेने त्याच्यावर नियंत्रण ठेवायचे परंतु हा कायदा मात्र प्रशासन पाळणार आहे आणि त्यावर नागरीक नजर ठेवणार आहेत. त्यामुळे तो एकमेवद्वितीय ठरतो.

जयपूर शहरातील अस्वच्छतेला कंटाळूनए. के. क्रुलवाल या नागरीकांने, साफसफाईबाबत महानगरपालीका नेमक्या काय उपाययोजना करते, ते जाणून घेण्यांची इच्छा दाखविली होती. या संदर्भात उच्च न्यायालयातील खटल्यात न्या. डी.एल.मेहता यांनी आपल्या निकाल पत्रात ''माहितीचा अधिकार'' हा नागरीकांचा मुलभूत अधिकार असल्याचे स्पष्ट केले. भारतीय राज्य घटनेत कलम १९ नुसार 'जे भाषण आणि अभिव्यक्त्याचे स्वातंत्र्य भारतीय नागरीकांना मिळाले आहे ते स्वातंत्र्य पुर्णपणे उपभोगायचे असेल तर माहिती मिळण्याचा अधिकार ही मुलभूतच मानला पाहीजे'. असे विषद केले. समाजसेवक अण्णा हजारे यांच्या २००१ च्या आंदोलानंतर महाराष्ट्रात 'माहितीचा अधिकार अधिनियम २००३' पासून अंमलात आला.

मानवाच्या विविध हक्काचे जतन करण्यासाठी भारत सरकारने काही कायदे व यंत्रणा उभारल्या असून त्याचा प्रत्यक्ष वापर जागृत व्यक्ती आपल्या हक्कांचे जतन व संरक्षण करण्यासाठी करु शकते. विविध क्षेत्रातील मानवी हक्काचे संरक्षण करण्यासाठी भारत सरकारने माहितीचा अधिकार कायदा १२ ऑक्टोबर २००५ पासून संपूर्ण भारतात लागू केला आहे. सरकारी व प्रशासकीय यंत्रणेवर व गुप्ततेच्या नांवासाठी नागरीकांना माहिती न पुरविण्याच्या क्रियेवर या कायद्याने एक प्रकारे अंकूश ठेवला आहे. माहिती अधिकाराचा कायदा हा भारतीय संसदेने आतापर्यन्त मंजूर केलेल्या कायद्यापैकी अत्यंत प्रगतीशिल कायदा असून भारतीय नागरीकांना त्याद्वारे कोणत्याही सरकारी किंवा खाजगी यंत्रणेतील कोणतीही माहिती, पारदर्शक कारभाराला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने मागविण्याचा अधिकार प्रदान करण्यांत आला आहे. हा कायदा होण्यापुर्वी गुप्ततेच्या नावाखाली, प्रशासकीय हितसंबंध जपण्यासाठी जी माहिती दडवून ठेवण्यांत येत होती ती आता या कायद्यान्वये पुरविणे संबधित अधिकाऱ्यावर बंधनकारक असून त्यात हलगर्जीपणा केल्यास संबंधीत कर्मचाऱ्यावर हक्कभंगाची कारवाई होवू शकते.

माहिती अधिकार कायद्यात एकुण ३१ भाग असून त्यात दोन अनुसूचिचाही समावेश आहे. या कायद्याच्या भाग ३ नुसार भारतातील सर्व नागरीकांना त्यांना पाहीजे ती माहिती मागविण्याचा हक्क प्रदान करतो. भाग २(१) नुसार माहितीचा अधिकार म्हणजे माहिती मिळविण्याचा अधिकार होय.

या कायद्याअंतर्गत नागरीकांना सार्वजनिक, खाजगी संस्थाच्या कार्यालयाकडून खालील माहिती मिळू शकते.

- एखाद्या कार्याच्या पर्यवेक्षणासंबंधी, दस्तऐवजासंबंधी व विविध नोंदीसंबंधी माहिती नागरीक मागवू शकतात.
- सरकारी नोंदी वा शेरे, सरकारी नोंदीचे उतारे, दस्तऐवजांच्या किंवा सरकारी नोंदणीच्या प्रमाणीत प्रती नागरीक मागवू शकतात.
- सरकार किंवा कोणत्याही संस्थेतर्फे निर्मीत वस्तूचे प्रमाणित नमूने नागरिक मागू शकतात.
- संगणकात किंवा त्यासंबंधीच्या यंत्रात साठवलेली कोणतीही माहिती जी डिस्केट्स्, फ्लॉपीज, ध्वनीफित, चित्रफीती किंवा अन्य कोणत्याही इलेक्ट्रानिक स्वरुपातील माहितीची प्रत नागरीक मिळवू शकतात.

कोणत्याही प्रकारचे तथ्य संकलन, खाजगी संस्थेसंबंधी कोणतीही माहिती समाविष्ट आहे. या संबधीची माहिती, नागरीकांना त्यांनी मागविल्यास पुरविणे अनिवार्य केले आहे.

**माहिती अधिकार कायद्याचा वापर**

माहिती अधिकार कायद्यानुसार एखादी विशिष्ट माहिती मागविण्यासाठी संबंधीताने त्याचा अर्ज केन्द्रीय जनसंपर्क व माहिती अधिकाऱ्याकडे किंवा राज्य सहाय्यक जनसंपर्क व माहिती अधिकाऱ्याकडे करणे आवश्यक असते. हा अर्ज इंग्रजीतून वा हिंदीतून योग्य त्या शुल्कासह पाठविणे गरजेचे असते.



Scanned by CamScanner

## निष्कर्ष

या संदर्भात म्हणता येईल की माहिती अधिकाराच्या कायद्यामुळे एरव्ही गुप्त म्हणून समजली जाणारी माहिती या कायद्यान्वये नागरीकांना उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यांत आली असून त्यामुळे अनेक गुप्त माहिती सरकारी घोटाळे, भ्रष्टाचाराची प्रकरणे उघड होणे शक्य झाले आहे. हे जरी सर्व खरे असले तरी मानवी हक्कांचे संरक्षण व जतन करण्याच्या संदर्भात मानवी हक्क सार्वभौमीक जाहीरनाम्याद्वारे जगातील नागरीकांना व भारतीय संविधानाद्वारे भारतीय नागरीकांना अनेक हक्क प्रदान करण्यांत आले असले, तरी प्रत्यक्षात त्या हक्कांवर आधारित ''सामाजिक न्याय'' मात्र संबंधीत नागरीकांना नाकारला जातो ही वास्तवता आहे.

## संदर्भ सूची :-


१) कुळकर्णी पी.के. :- मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, डायमंड पब्लीकेशन पुणे.

२) गवई सुभाष :- भारतीय संविधानात्मक तरतूदी आणि वास्तव. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

३) मानगांवकर दिलीप :- माहितीचा अधिकार अधिनियम २००५,राजहंस प्रकाशन, पुणे.

४) पंडीत विवेक :- मानवी अधिकारांची संकल्पना.

५) शिरूरकर देवेंद्र :- मानवी हक्क म्हणजे काय? मुक्तरंग प्रकाशन, लातूर.





Scanned by CamScanner